Exh.01

**अहमदनगर येथील मे चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टात**

एस.टी.सी. नंबर

2339 /२०२६ फिर्यादी

**गोरेश्वर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था**

मर्यादीत गोरेगांव,ता.पारनेर जि.अहमदनगर

शाखा-**कर्जुले हर्या** ता.पारनेर जि.अहमदनगर

तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी

**श्री.जालिंदर जनाजी नरसाळे**

वय-५२ वर्षे धंदा-नोकरी

रा.गोरेगांव ता.पारनेर जि.अहमदनगर

मो नं ९८५०९६१७८०

आरोपी

**अनिल बबन पुंडे**

वय-३२ वर्षे धंदा-शेती

रा.मु पो पिंपळगांव रोठा

ता.पारनेर जि.अहमदनगर

मो न.८३८१०३१५१०

गुन्हा-निगोसिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार

याकामी फिर्यादी कळवितात ते खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १.चेक देणाराचे नांव | - अनिल बबन पुंडे |
| २.चेक कोणत्या बँकेचा | - एचडीएफसी बँक,शा.पारनेर ता पारनेर |
| ३.चेक नंबर व तारीख | - ००००0२ ता २३/१२/२०२५ रु.२२,२७४/- |
| ४.चेक भरल्याची तारीख | - २३/१२/२०२५ |
| ५.चेक परत आल्याची तारीख | - २४/१२/२०२५ |
| ६.चेक परत आलेचे कारण | - " फंडस इनसफिशियंट " |

७.नोटीस पाठविलेची ता. - तारीख ०९/०१/२०२६

८.नोटीस स्विकारली ता - तारीख २८/०१/२०२६

९.गुन्हा घडला कारण - तारीख २४/१२/२०२५ रोजी चेक परत आला त्यावेळी तदनंतर नोटीस पाठवुनही आरोपीने मुदतीत चेकची रक्कम आणुन दिली नाही.

१०.कोणत्या पोलिस स्टेशनचे हद्दीत गुन्हा घडला. - कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर

१. फिर्यादी गोरेश्वर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत,गोरेगांव ता.पारनेर जि. अहमदनगर ही महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अन्वये स्थापन झालेली सहकारी पतसंस्था असुन तीचा कारभार सहकारी कायदयानुसार तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो.फिर्यादी संस्थेचे मुख्य कार्यालय गोरेगांव ता.पारनेर जि.अहमदनगर येथे असुन अहमदनगर जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी शाखा आहेत.त्या पैकी **कर्जुले हर्या** ता.पारनेर जि.अहमदनगर येथे एक शाखा आहे.फिर्यादी संस्थेचे वतीने फिर्यादी दाखल करणे,त्यावर सहया करणे,जबाब देणे, व्हेरीफिकेशन करणे,ॲफिडेव्हिट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशिर कामे करण्याबाबत फिर्यादी संस्थेचे मा.संचालक मंडळाने ठराव करुन श्री.जालिदर जनाजी नरसाळे यांना अधिकार दिलेले आहेत.तसा ठराव असुन त्याचे प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

२. फिर्यादी संस्थेचे वतीने तीचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योगधंदयासाठी,घर बांधकामासाठी,वाहन खरेदी,बचतगट व उदयोजक बचतगटानरा तसेच इतर घरगुती कारणासाठी कर्जपुरवठा केला जातो तसेच ठेवी गोळा करुन बँकींगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला जातो.आरोपी तसेच **सुवर्णा प्रकाश नरवडे** हया बचत गट कर्जुले हर्या या बचत गटाचे सभासद आहेत.आरोपी तसेच **सुवर्णा प्रकाश नरवडे** हे फिर्यादी संस्थेचे सभासद आहेत. **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांनी फिर्यादी संस्थेकडुन **व्यवसाय वाढीसाठी बचत गट वैयक्तीक** कर्जाऊ रक्कम मिळावी म्हणुन कर्जाची मागणी केलेली होती.त्यानुसार **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांची कर्जाची मागणी मंजुर करुन त्यांना रक्कम रुपये ३०,०००/- चे कर्ज मंजुर करुन कर्जप्रकरणातील अटी व शर्तीवर दिनांक ३०/०४/२०१९ रोजी अदा करण्यात

आलेले आहे. सदरील कर्जास आरोपी हे संमतीदार म्हणुन राहीलेले आहेत.सदर कर्जाची फेड **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांनी त्यावरील होणारे व्याजासहीत ठराविक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते .तसेच **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांनी कर्जाची फेड न केल्यास आरोपी यांनी संमतीदार या नात्याने सदरील कर्जाची फेड करण्याची जबाबदारी स्विकारलेली आहे. मात्र आरोपी अगर मुळ कर्जदार **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांनी सदर रक्कमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे.अनेक वेळा मागणी करुनही मुळ कर्जदार यांनी सदरील कर्जाची रक्कम आणुन दिलेली नाही.शेवटी फिर्यादी यांनी मुळ कर्जदार तसेच संमतीदार यांच्याकडे कर्जाची मागणी करता सुवर्णा प्रकाश नरवडे व आरोपी यांनी फिर्यादी संस्थेत येवुन आरोपीने संमतीदार या नात्याने **सुवर्णा प्रकाश नरवडे** यांनी घेतलेल्या कर्जाचे थकीत बाकी पोटी त्यांचे खाते असलेल्या **एचडीएफसी बँक, शाखा-पारनेर ता पारनेर जि अहमदनगर** या बँकेचा चेक नंबर ००००० २ रक्कम रुपये २२,२७४/- दिनांक २३/१२/२०२५ रोजीचा दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चित वटेल अशी खात्री व भरवसा दिल्यावरुन सदरचा चेक फिर्यादी यांनी स्वीकारला.

३. आरोपी यांनी दिलेला चेक फिर्यादी संस्थेने त्याचे खाते असलेल्या जी एस महानगर को ऑप बॅक लि. शाखा-मार्केटयार्ड,अहमदनगर येथे तारीख **२३/१२/२०२५** रोजी भरला असता सदरचा चेक " फंडस इनसफिशियंट " अशा शेरा मारुन तारीख **२४/१२/२०२५** रोजी परत पाठविला.तशी इंटीमेशन फिर्यादी यांना त्यांचे बँकेने देऊन त्यासोबत सदरील चेक न वटता मेमोसहीत परत केलेला आहे.

४. सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकीलामार्फत तारीख ०८/०१/२०२६ रोजी नोटीस पाठवुन चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकचे रक्कमेची मागणी केली असता सदरची नोटीस आरोपीने दिनांक २८/०१/२०२६ रोजी स्वीकारली आहे. मात्र नोटीस मिळुनही आरोपीने मुदतीत फिर्यादीस चेकची रक्कम आणुन दिलेली नाही.

आशाप्रकारे चेक देतांना आरोपीचे खात्यात रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपुर्वक सदरचा न वटणारा चेक देऊन फिर्यादीची फसवणुक केलेली आहे व निगोसिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर

स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणुन फिर्यादीची आरोपी विरुध्द निगोसिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

<u>तरी फिर्यादीची विनंती की-</u>

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाचे रक्कमेतुन फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा ही विनंती.

<u>याकामी फिर्यादी तर्फे तुर्त साक्षीपुरावा खालीलप्रमाणे-</u>

अ. शाखाधिकारी,

एचडीएफसी बँक

शाखा पारनेर ता पारनेर जि अहमदनगर

साक्षीस माहितगार इसमांस हजर ठेवणे व येतांना आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेऊन साक्षीस हजर रहावे.

ब. <u>शाखाधिकारी</u>

जी.एस महानगर को ऑप बॅक लि

शाखा- मार्केटयार्ड अहमदनगर

साक्षीस माहितगार इसमांस हजर ठेवणे व येतांना आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेऊन साक्षीस हजर रहावे.

येणेप्रमाणे फिर्यादीतर्फे तुर्त साक्षीपुरावा असे जादा पुरावा लागल्यास तो देण्याची फिर्यादीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

तारीख ५/२/२०२६

ॲडव्होकेट

फिर्यादी

गोरेश्वर ग्रामीण [illegible] सह.पतसंस्था मर्या.
गोरेगाव, ता. पारनेर, जि. अ.नगर

**S.C.C.No. 2339/2026**

**Goreshwar Gramin Bigarsheti Sahakari Patsanstha Maryadit**
**Vs.**
**Anil Baban Punde**

**ORDER BELOW EXH.1**

Perused complaint. Perused verification and documents annexed with the complaint. Heard learned advocate for the complainant. The accused is resident within the jurisdiction of this Court. The affidavit of authorized officer for the complainant is on record. Contents therein suffice the purpose of inquiry held under Section 225 of Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023. No further inquiry in this regard for issuance of process is necessary. Upon perusal of aforesaid documents, it appears that offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881 has been specifically made out by the complainant against the accused. Hence, issue process against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

**In addition, service of summons by R.P.A.D. is allowed.**

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.03.09 11:50:47 +0530

Ahmednagar
Date : 09.03.2026

**(S. R. Shinde)**
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.18), Ahmednagar